सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मृद व जलसंधारण विभाग

आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.)

वाल्मी परीसर, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर-४३१००२

---

## जाहीर सूचना

मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट "ब" (अराजपत्रित) या संवर्गातील ६७० पदे सरळसेवेने भरण्यासाठी दि.१९/१२/२०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरहू परीक्षा ही शासन मान्य टि. सी. एस. या कंपनीमार्फत, राज्यातील २८ जिल्हयातील निश्चित केलेल्या एकूण ६६ केंद्रांवर दि. २०/०२/२०२४ व दि.२१/०२/२०२४ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आली होती.

तथापि, नांदगाव पेठ, अमरावती येथील केंद्रावर दि.२१/०२/२०२४ रोजी घडलेल्या गैरप्रकाराच्या अनुषंगाने सदर परीक्षा शासन मान्यतेने रद्द करण्याचा निर्णय दि.१५.०३.२०२४ रोजी घेण्यात आलेला होता.

जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट "ब" (अराजपत्रित) या संवर्गातील ६७० पदभरतीसाठी दि.१४, १५ व १६ जुलै २०२४ या कालावधीत फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर परीक्षा ही राज्यातील मुंबई, पुणे, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, नांदेड, छत्रपती संभाजीनगर या ७ शहरांतील एकुण १० टिसीएस-आयओएन या अधिकृत केंद्रावरच घेण्यात येणार आहे. परीक्षेचे वेळापत्रक, प्रवेशपत्र इ. बाबत सर्व उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

अध्यक्ष,राज्यनिवड समिती तथा आयुक्त

आयुक्तालय, मृद व जलसंधारण,

छत्रपती संभाजीनगर.

दि: २४/०६/२०२४